सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ५४

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

Maharashtra Water Resources Regulatory Authority

क्रमांक : मजनिप्रा/२०१८/विधिविषयक/प्रकरण क्र १० (२०१८)/९०८

दि. १२/१२/२०१८

**उजनी प्रकल्पातुन आष्टी धरणाला नियमित पाणी सोडण्याच्या प्राथमिक विवाद निवारण अधिकाऱ्यांचे (पीडीआरओ) दि. ०६/०४/२०१८ च्या आदेशाविरुध्द आष्टी जलाशय शेती पाणी नियोजन समिति (प्रोपा) यांनी दाखल केलेल्या याचिकेविषयी – प्रकरण क्र. १०/२०१८**

या सोबत दि. १२/१२/२०१८ चा मजनिप्रा आदेश क्र. १८/२०१८जोडला आहे

सहपत्र: वरील प्रमाणे

स्वा.

(डॉ. सुरेश कुळकर्णी)

सचिव

प्रति:– माहितीकरिता व आवश्यक कार्यवाहीसाठी–

१. आष्टी जलाशय शेती पाणी नियोजन समिति (प्रोपा), मार्फत ॲड. महादेव चौधरी, ३/अ/००३, श्रद्धा सीएचएस लि. म्हाडा कॉलनी, चांदीवली, पवई, मुंबई, ४०००७२ .................. याचिकाकर्ता

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: (O)+91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in mwrralibrary@yahoo.co.in
website : www.mwrra.org

२. अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर क्लब समोर, सोलापूर, ४१३००३.....प्रतिवादी क्र. १

३. कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग नं. २, सोलापूर, ४१३००३ .......... प्रतिवादी क्र. २

४. उपविभागिय अधिकारी, भिमा सिंचन उपविभाग, तुंगट, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, ४१३३०४... प्रतिवादी क्र. ३

५. प्राथमिक विवाद निवारण अधिकारी (पीडीआरओ) व मुख्य अभियंता (वि. प्र.), जल संपत्ती विभाग, सिंचन भवन बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११.................... प्रतिवादी क्र. ४

सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ५४

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

Maharashtra Water Resources Regulatory Authority

## आदेश क्रमांक क्र १८/२०१८

**उजनी प्रकल्पातुन आष्टी धरणाला नियमित पाणी सोडण्याच्या प्राथमिक विवाद निवारण अधिकाऱ्यांचे (पीडीआरओ) दि. ०६/०४/२०१८ च्या आदेशाविरुध्द आष्टी जलाशय शेती पाणी नियोजन समिति (प्रोपा) यांनी दाखल केलेल्या याचिकेविषयी– प्रकरण क्र. १०/२०१८**

**आष्टी जलाशय शेती पाणी नियोजन समिति (प्रोपा), मार्फत त्यांचे अध्यक्ष/सचिव, राहणार पापरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर ......................... याचिकाकर्ता**

विरुध्द

१. अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर क्लब समोर, सोलापूर, ४१३००३

२. कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग नं. २, सोलापूर, ४१३००३

३. उपविभागिय अधिकारी, भिमा सिंचन उपविभाग, तुंगट, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, ४१३३०४

४. प्राथमिक विवाद निवारण अधिकारी (पीडीआरओ) व मुख्य अभियंता (वि. प्र.), जल संपत्ती विभाग, सिंचन भवन बार्ने रोड, मंगळवार पेठ, पुणे, ४११०११

५. महाराष्ट्र राज्य. ........................................ **प्रतिवादी**

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: (O)+91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in mwrralibrary@yahoo.co.in
website : www.mwrra.org

**कोरमः—**

**श्री. व्ही. एम. कुळकर्णी, अध्यक्षीय सदस्य, (ज. सं. अभियांत्रिकी)**

**श्री. विनोद जे. तिवारी, सदस्य, (विधि)**

**डॉ. शिवाजी टी. सांगळे, सदस्य (इकॉनॉमीक्स)**

**दि. १२/१२/२०१८**

## पार्श्वभूमी

१. याचिकाकर्ते यांनी आष्टी जलाशय शेती पाणी नियोजन समिति, पाप्री (प्रोपा) करिता व मार्फत प्राधिकरणाकडे याचिका, त्यांचे गाऱ्हाण्याचे निवारणार्थ, दि. ०८/०३/२०१७ ला दाखल केली. प्राधिकरणाचे सचिवांनी याचिकाकर्त्याला निर्देश दिले की, त्यांनी प्रथम प्राथमिक विवाद निवारण अधिकारी (पीडीआरओ) यांचेकडे आपली तक्रार करावी; जर त्यावरही समाधान प्राप्त न झाले तर ते प्राधिकरणाकडे येऊ शकतात.

२. त्याप्रमाणे, अपीलार्थीने दि. ११ एप्रिल २०१७ ला त्यांची तक्रार पीडीआरओ कडे दाखल केली त्यांनी बऱ्याच सुनावण्या केल्यानंतर, अपीलार्थीचा दावा फेटाळला व तसा आदेश दि. ०६/०४/२०१८ ला जारी केला; जो अपीलार्थीला जुन २०१८ च्या दुसऱ्या आठवडयात मिळाला.

३. अपीलार्थींनीच्या आधी मुख्य अभियंता (वि.प्र) ज. सं. विभाग, पूणे व भिमा खोऱ्याचे पीडीआरओ यांचेकडे, दि. १६/११/२०१७ ला अर्ज दाखल करुन त्यांना १ टीएमसी पाणी प्रत्येक आवर्तनात आष्टी मध्यम प्रकल्पात उजनी धरणातुन सोडण्याची विनंती केली होती.

४. अपीलार्थीचा अर्ज पीडीआरओ ने फेटाळला. ते म्हणाले की उजनीच्या प्रकल्प नियोजनात १ टीएमसी पाणी सोडण्याची तरतूद आष्टी मध्यम प्रकल्पात आष्टी उपसा सिंचन योजने (एलआयएस) करिता आहे, पण प्रत्येक आवर्तनात १ टीएमसी पाणी सोडण्याची तरतूद नाही.

५. या पीडीआरओ च्या निर्णयाने व्यथित होऊन, अपीलार्थीने मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम २२ (३) अन्वये प्राधिकरणाकडे दि. ०९/०८/२०१८ ला अध्यक्ष/सचिवा मार्फत अर्ज केला.

## अपीलाचा सारांश

६. अपीलात दिलेल्या विषयाचा सारांश खाली दिल्याप्रमाणे आहे.

अ) गावच्या शेतकऱ्यांनी त्यांचे त्या भागातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ही प्रस्तावित संस्था बनवली आहे. हे शेतकरी संपुर्ण पणे शेतीचा व्यवसाय करतात व संपुर्ण पणे ते आष्टी धरणाच्या पाण्यावर अवलंबुन आहेत, जे ते स्वखर्चाने तयार केलेल्या पाईपलाईन व्दारा स्वत:च्या शेतात वापरतात.

ब) एक टीएमसी क्षमता असलेले आष्टी धरण सन १८८३ मधे बांधले आहे, ज्यामुळे आसपासच्या गावांना सिंचनाची सोय उपलब्ध होते. स्वातंत्र्यानंतर शासनाने भिमा नदीवर, सोलापूर जिल्हयात, उजनी धरण बांधले, ज्याची क्षमता ११७.६३ टीएमसी आहे.

क) प्रतिवादी प्राधिकारी सन १९८७ पासुन आवर्तनाच्या दिवसात आष्टी धरणासाठी उजनी उजवा किनारा कालव्यातुन पाणी सोडत आहे. प्रतिवादी प्राधिकारी यासाठी आसपासच्या गावातील शेतकऱ्यांसाठी पाणी परवाना जारी करतात, ज्यांनी आष्टी धरणातुन पाणी घेण्यासाठी पाईप लाईनची व्यवस्था स्वत: केली आहे.

ड) परंतु गेल्या ३—४ वर्षापासून आष्टी धरणांसाठी उजनी कालव्यातुन पाणी सोडण्यात आनाकानी करतात ती मुख्यत: या साठी की उजनी प्रकल्पातुन अशाप्रकारे पाणी सोडण्याची तरतुद नाही.

**प्रार्थना**

७. अपीलार्थीने केलेल्या प्रार्थनेचा मतितार्थ खाली दिल्याप्रमाणे आहे:—

अ) दि. ०६/०४/२०१८ ला जारी केलेल्या आक्षेपित आदेशाचे अभिलेख व कामकाजाचे तपशील मागविण्यात यावा.

ब) या आक्षेपित दि. ०६/०४/२०१८ च्या आदेशाची वैधता व कायदेशिरता प्राधिकरणाने प्रतिवादी क्र. ४ च्या या आदेशाची तपासणी करावी व तो खारीज करावा, निकालात काढावा.

क) संबंधित प्रतिवादी/अधिकारी यांना योग्य त्या आदेशाने/निर्देशाने, पाण्याचे आरक्षण/वाटप, जवळ जवळ ५ ते ६ टीएमसी, उजनी धरणातुन नेहमी करिता आष्टी धरणाला त्यांच्या उजव्या किनारा कालव्यातुन सोडण्याचे या प्राधिकरणाने निर्देश द्यावेत.

ड) जो पर्यंत या प्रकरणाची सुनावणी व अंतिम कार्यवाही लंबित आहे, तो पर्यंत, जेंव्हा केंव्हा उजनी उजवा किनारा कालव्यातुन पाणी सोडल्या जाईल त्यावेळी, एक टीएमसी पाणी यातुन आष्टी धरणात सोडण्यासाठी निर्देश देण्यात यावेत.

इ) प्रार्थनेच्या (ड) खंडात सांगितल्याप्रमाणे अंतरिम व अंतरिम कालीन अनुतोष अपीलार्थीना देण्यात यावा.

फ) जो योग्य वाटेल असा दुसरा कोणताही व पुढील अनुतोष अपीलार्थीला देण्यात यावा.

**प्राधिकरणा समोर चाललेले कामकाज :**

८. या प्राधिकरणाने दि. २६/०९/२०१८ ला सुनावणी घेतली ज्यात सर्वांना सुनवाणी दरम्यान भरपूर संधी देण्यात आली. सुनावणी साठी खालीलप्रमाणे हजेरी होती.

| | | |
|---|---|---|
| १. | अॅड. महादेव चौधरी | – अपीलार्थी व अपीलार्थीचे अॅडव्होकेट |
| २. | श्री. एन. व्ही. जोशी | – कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग, क्र. २, सोलापूर, प्रतिवादी क्र. २ करिता |
| ३. | श्री. बी. डी. रोंगे | – उपविभागिय अभियंता, भिमा सिंचन उपविभाग, तुंगट प्रतिवादी क्र. ३ करिता |
| ४. | श्री. बाळासाहेब जाधव | – उपविभागिय अभियंता, उजनी कालवा विभाग ८, सेलापूर, प्रतिवादी करिता. |

९. अपीलार्थींनी युक्तिवादा दरम्यान खालील मुद्दे मांडलेत आणि विनंती केली की प्रतिवादी प्राधिकाऱ्यांनी दर आवर्तनाला एक टीएमसी पाणी आष्टी धरणात उजनी धरणातुन सोडावे.

१. आष्टी धरण १८८३ मधे बांधलेले आहे

२. त्यानंतर, भिमानदीवर उजनी धरण बांधले आहे

३. उजनी धरणाचा उजवा किनारा कालवा आष्टी धरणाजवळ आहे

४. १९८७ पासुन प्रतिवादी प्राधिकारी आष्टी धरणात उजनी कालव्याने पाणी सोडत होते.

५. प्रतिवादी प्राधिकाऱ्यांनी व्यक्तीशः शेतकऱ्यांसाठी पाणी परवाना जारी केला आहे ज्याचे नुतनीकरण वेळोवेळी करण्यात येते; व शेतकरी पाण्याचे बील देत आहेत.

६. शेतकऱ्यांनी वित्तीय संस्थाकडुन कर्ज घेऊन व्यक्तीशः पाण्याच्या उपस्याची व्यवस्था केली आहे.

७. प्रतिवादी प्राधिकारी गेल्या ३–४ वर्षापासून उजनी कालव्यातुन आष्टी जलाशयात पाणी सोडण्यास आनाकानी करुन राहीलेत.

१०. श्री. एन. व्ही. जोशी, कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग, क्र. २, सोलापूर यांनी प्रतिवादी क्र. २ करिता त्यांची बाजु मांडली.

१. आष्टी धरणाची मुळ क्षमता २३.०१ द.ल.घ.मी. (०.८१ टीएमसी) होती जी आता गाळ साचल्यामुळे घटुन १८.९१ दलघमी (०.६७ टीएमसी) झाली आहे.

२. आष्टी धरणाच्या जलग्रहण क्षेत्रातुन जे पाणी आष्टी धरणात येते त्यातुन शेतकऱ्याला व्यक्तिशः धरणातुन पाणी ओढण्याची परवानगी दिली जाते.

३. आष्टी धरणाचे बहुतांशी लाभक्षेत्र हे आता उजनी प्रकल्पाच्या कालव्याने व्यापलेले आहे.

४. व्यक्तिगत उपसा करणाऱ्या शेतकऱ्यांना, उजनी कालव्यातुन आष्टी धरणात येणाऱ्या पाण्यातुन, पाणी देण्याची तरतुद नाही.

५. तथापि, सध्या आष्टी उपसा सिंचन योजना प्रगतीपथावर असल्याने, पुर्ण झाल्यावर व्यक्तिगत उपशासाठी ती योजना पाणी पुरवु शकेल. ही योजना अजुन कार्यरत झाली नाही. उजनी कालव्यातुन १ टीएमसी पाणी आष्टी धरणात योजनेसाठी सोडण्याची परवानगी आहे. पण ही परवानगी व्यक्तिगत उपशासाठी लागु नाही.

६. ही आष्टी उपसा सिंचन योजना सुरु झाल्यावर उपसा सिंचन योजनेचे क्षेत्र व व्यक्तिगत उपसा करणाऱ्यांचे क्षेत्र, कांही प्रमाणात कां होईना, एकमेकांवर बसणारे असेल.

११. प्रतिवादींनी अपीलार्थीला दिलेल्या पाणी परवान्याची प्रत सादर केली. त्याचा तपशील खाली दिला आहे:–

१. पाणी परवाना, अपीलार्थीला २२/०४/२०१५ ला जारी केला आणी फेब्रु २०३३ पर्यंत वैध आहे.

२. ही परवानगी ५ अश्वशक्ती पंपासाठी आहे.

३. ही परवानगी ३४८८.३८ घमी पाणी खरीप हंगामात व ४७४९.६४ घमी रबी हंगामात पाणी वापरासाठी आहे. म्हणजे एकुण परवानगी ८२३८.०२ घमी (०.०००२९टीएमसी) साठी आहे.

४. या पाणी परवान्यामध्ये २० अटी टाकल्या आहेत. त्यातील कांही महत्वाच्या अटी अशा आहेत.

   अ) परवाना धारकाला वापरलेले पाणी मोजण्यासाठी पाण्याचे मिटर लावावे लागेल व त्याची निगा व्यवस्थित राखावी लागेल. अपीलार्थी ने ही अट पाळली नाही.

   ब) जो हिस्सा मंजुर झाला आहे आहे तो १००% चल साठा आष्टी धरणात उपलब्ध राहील या अटीवर आहे. जर त्यात कमी साठा असेल तथा त्यातील पाण्याचे पेयजल / औद्योगिक वापरासाठी आरक्षण असेल, तर कालवा अधिकारी हा हिस्सा कमी करु शकतात, किंवा पाणी उचलण्यास प्रतिबंध करु शकतात.

   क) अट क्र. १० मधे अपीलार्थीला सेवेचा तरतुदी साठी फार्म क्र. ७ मधे (किंवा दुसऱ्या कोणत्याही नमुन्यात), अधिसूचनेच्या प्रतिसादार्थ, अर्ज करावा लागतो.

   ड) महाराष्ट्र सिंचन अधिनियम १९७६ मधील तरतुदी, त्यात नंतर केलेली सुधारणा, नियम, शासननिर्णय व शासनाने जारी केलेली मार्गदर्शिका इ. लागु राहील.

## सत्यस्थिति

१२. अपीलार्थी हा प्रस्तावित पाणी वापर संस्थेचा म्हणजे जलाशय शेती पाणी नियोजन समिति, पापरी (प्र) सदस्य आहे. तथापि, या संस्थेचे अजुन पंजीकरण व्हायचे आहे. अशारितीने अपीलार्थीने स्वत:च्या योग्यतेवर प्राधिकरणाकडे अर्ज केला आहे.

१३.दि. २६ सप्टेंबर २०१८ च्या सुनवाणी दरम्यान प्राधिकरणाने अपीलार्थींला त्याच्या पाणी वापर संस्थेच्या पंजीकरणाची कागदपत्रे २ आठवडयांचा आत सादर करण्याची संधी दिली होती. तथापि, अपीलार्थी सदर आदेशाच्या तारखेपर्यंत कागदपत्रे देऊ शकले नाही.

१४.अपीलार्थीला ८२३८ घमी पाणी आष्टी जलाशयातुन, २१ निरनिराळया अटींवर, घेण्याची परवानगी दिली होती. प्रतिवादींनी सांगितल्याप्रमाणे ही परवानगी आष्टी धरणाला त्याच्या जलग्रहण क्षेत्रातुन प्राप्त झालेल्या पाण्यासाठी आहे.

१५.आष्टी उपसा सिंचन योजनेचे बांधकाम सुरु आहे. या योजनेसाठी एक टी.एम.सी. पाणी उजनी कालव्यातुन देण्याचे प्रस्तावित आहे. ही योजना अजुन कार्यरत झालेली नाही. आष्टी उपसा सिंचन योजनेच्या मिळणाऱ्या लाभार्थी मधे सध्या जे व्यक्तिगत उपसा योजना वापरणारे आहेत त्यापैकी काही लाभार्थी या योजनेत येतात.

१६.प्राधिकरणाने अपीलार्थीला त्याची स्वत:ची स्थिती, पात्रता सिध्द करण्यासाठी पाणी वापर संस्थेमार्फत अर्ज करण्यास सांगितले. तथापि, अपालार्थी संस्थेचे पंजीकरण पत्र सादर करु शकला नाही. अपीलार्थी, ज्यांच्याकरिता त्याने अर्ज केला होता त्यांच्या कडुन प्राधिकार पत्र तो सादर करु शकला नाही. अपीलार्थी त्याचा स्वत:चा पाणी परवाना देखील दाखल करु शकला नाही.

१७.प्राधिकरणाने अपीलार्थीला दि. २६ सप्टे. २०१८ पर्यंत त्याची स्वत:ची स्थिती/पात्रता सिद्ध करण्यासाठी वेळ दिला होता. पण अपीलार्थी त्याचे पालन करु शकला नाही.

## मुद्दे सांचेबध्द करणे

१८.अपीलात जे मुद्दे दिले आहेत व प्रतिवादींनी दिलेली उत्तरे ध्यानात घेता, खाली दिलेले मुद्दे विचारार्थ घेतले आहेत.

**१. अपीलार्थीला १ टीएमसी पाणी उजनी धरणातुन कालव्यामार्फत आष्टी जलाशयात प्रत्येक आवर्तनात सोडण्यासाठी मागणी करण्याचा कायदेशीर हक्क आहे काय.**

**२. अपीलार्थीची १ टीएमसी पाणी उजनी धरणातुन कालव्यामार्फत आष्टी जलाशयात प्रत्येक आवर्तनात सोडण्यासाठी केलेली मागणी तर्कसंगत आहे काय?**

## प्राधिकरणाचे निष्कर्ष

१९. प्राधिकरणाने काढलेले निष्कर्ष खाली दिले आहेत.

**१. अपीलार्थीला १ टीएमसी पाणी उजनी धरणातुन कालव्यामार्फत आष्टी जलाशयात प्रत्येक आवर्तनात सोडण्यासाठी मागणी करण्याचा कायदेशीर हक्क आहे काय.**

जल संपत्ती विभागाने अपीलार्थीला ८२३८ घमी पाणी ५ अश्वशक्ती पंपाने आष्टी धरणाच्या जलाशयातुन दरवर्षी घेण्याची परवानगी दिली आहे. पण हा हिस्सा, त्यांना देताना आष्टी जलाशयात १०० टक्के चल संग्रहण असणे गरजेचे आहे या अटीच्या आधीन आहे. अट क्र. ३ प्रमाणे, एखादया वर्षात पाणी कमी असेल किंवा पाण्याचे पेयजल/औद्योगिक वापरासाठी आरक्षण असेल तर कालवा अधिकारी हा हिस्सा कमी करु शकतात, किंवा पाणी उचलण्यास प्रतिबंध करु शकतात. त्यापुढे जाऊन हा हिस्सा अपीलार्थीला देणे विविध २१

अटींच्या अधिन आहे. अट क्र. ४ प्रमाणे परवाना धारकाला वापरलेले पाणी मोजण्यासाठी पाण्याचे मिटर लावावे लागेल व त्याची निगा व्यवस्थित राखावी लागेल. अपीलार्थी ने ही अट पाळली नाही.

नैसर्गिकरित्या ही परवानगी आष्टी धरणाला केवळ त्याच्या जलग्रहण क्षेत्रातुन प्राप्त झालेल्या पाण्यासाठी आहे. ही परवानगी उजनी धरणातुन सोडल्यामुळे उपलब्ध झालेल्या पाण्यासाठी नाही.

वर दिलेली निरीक्षणे विचारात घेता, या प्राधिकरणाचे असे मत आहे की, अपीलार्थीला पाणी उजनी धरणातुन कालव्याव्दारे सोडा हे सांगण्याचा कायदेशीर हक्क नाही.

**२. अपीलार्थींची १ टीएमसी पाणी उजनी धरणातुन कालव्यामार्फत आष्टी जलाशयात प्रत्येक आवर्तनात सोडण्यासाठी केलेली मागणी तर्कसंगत आहे काय?**

जल संपत्ती विभागाने अपीलार्थीला ८२३८ घमी पाणी ५ अश्वशक्ती पंपाने आष्टी धरणाच्या जलाशयातुन दरवर्षी घेण्याची परवानगी दिली आहे, परंतु अपीलार्थींची मागणी आहे की, एक टीएमसी पाणी उजनी धरणातुन प्रत्येक आवर्तनात सोडले जावे. एक टीएमसी पाणी म्हणजे २८.३१६८ दलघमी जे अपीलार्थीला मंजुरी केलेल्या हिस्स्याच्या ३४५० पट आहे.

वरील निरिक्षणावरुन, प्राधिकरणाचे असे मत आहे की, अपीलार्थींची एक टीएमसी पाणी उजनी धरणातुन प्रत्येक आवर्तनात सोडले जावे ही मागणी मुळीच समर्थनीय नाही.

**२०. अंतिम आदेश/निर्देश :**

या वादात दोन्ही पक्षांचे मत ऐकूण घेतल्यावर, समोर आलेल्या कागदपत्रांचा तसेच अभिलेखावर असलेल्या माहितीचा व त्यांनी जे सादरीकरण केले, तसेच वरील मुद्यांवर उत्तर दिल्यावर, प्राधिकरण खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

अपील निकालात काढण्याच्या योग्यतेचे आहे.

त्याप्रमाणे अपील निकालात काढले आहे. जो आदेश प्राथमिक विवाद निवारण अधिकाऱ्यांनी (पीडीआरओ) दिला आहे तो ग्राहय आहे.

सत्यस्थिती पाहता खर्चाविषयी यात कांही उल्लेख नाही.

दि. १२/१२/२०१८ ला निर्गमित केले.

स्वा.
डॉ. एस. टी. सांगळे
सदस्य (इकॉनॉमिक्स)

स्वा.
विनोद जे. तिवारी
सदस्य, (विधि)

स्वा.
डॉ. व्ही. एम. कुळकर्णी
अध्यक्षीय सदस्य (ज.सं.अभियांत्रिकी)